31 Dec

# गोळा बेरीज

वर्ष सरत आलं आणि सालाबाद प्रमाणे
आयुष्याची गोळाबेरीज सुरु झाली

काही सुखलेले क्षण तर काही हृदयाशी घट्ट
धरलेल्या आठवणींने मनाची घालमेल झाली

चरैवेती चरैवेती म्हणता म्हणता
आयुष्याची संध्याकाळ येऊन ठेपली
तरी गोळाबेरीज जमेकडे काही झुकेना
आणि वाद संवादाचं संतुलन काही होईना...

येतीलही असे किती क्षण आणि जातीलही
पण अंतरातील मनाचा ठाव अजूनही लागेना
ते काय शोधतंय, कशासाठी आणि का?
याच गुंतलेलं गणित काही केल्या सुटेना...

मग जरा वाट हृदयाकडे वळवली [2]

आणि त्याच्या ठोक्यांची. जाणीव झाली

एवढे वर्षं दुर्लक्षिलेलं हृदय.

जरा धूळ झटकून बोलू लागलं...

बाई मला विसरलीस का!, म्हणून टेरखवू लागलं...

हळूच म्हणालं जरा पाणी वळून बघ [2]

तारेवरची कसरत करीत अजूनही ठाम उभी आहेस

जबाबदाऱ्यांच्या पलिकडचे मोलाचे

क्षण जपून फुली वाट्याला करत आहेस...

हिंमत आणि विश्वासाच्या पुंजीला नसतं कधी मोल

व्यावहारिक गोष्टींसोबत वेळ जाईल खोल....

नवी पुंजी आणि नव्या दिशेनं मन अगदी

भरून आलं..

नव्या वर्षाची नव्या अनुभवाची

आतुरतेने वाट पाहू लागलं ....

# घर तळ्याकाठी

Aug 22

तळ्याकाठी घर असावं
स्वप्नांचे हे गाव वसावं..
फुलपाखरांच्या पंखावरुनी
रानमार्ग धुंडाळून चालावं...

या गावात एक देऊळ असावं
हरिनामाच्या गजरामध्ये
शक्ती आणि भक्तीने
नामस्मरण करावं

मनाच्या या रानावनात
खळखळणारा ओढा असावा
आनंदाने कुठेही भरावा
जीवनभरही साफल्य व्हावं

चांदण्याच्या या आकाशगंगेत
मन समृद्धीने न्हाऊन निघावं
पुढचा एकदा जीवन घेईन
निरोपाचेही सार्थक व्हावं